रजि.नं. : ई-६९, अहमदनगर

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

शिर्डी : पोष्ट : शिर्डी - ४२३ १०९, ता. राहाता, जि. अहमदनगर, महाराष्ट्र (भारत).
दुरध्वनी : +९१-२४२३-२५८ ५०० फॅक्स : +९१-२४२३-२५८ ७७०, टेलिग्राम : साईनाथ, शिर्डी.

जा.नं.एसएसएस/वशी -०८/1364/२०२४
दिनांक- 2 4 AUG 2024

प्रति,
मे.------------------------------------------------
--------------------------------------------------
--------------------------------------------------
--------------------------------------------------

**विषय:- देणगी काऊंटर्स येथे देणगीदार साईभक्तांना उदी प्रसाद देणेकामी सफेद प्रिंटेड पाकिटे छपाईसह खरेदी करणे कामी दरपत्रक देणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी सामान्य प्रशासन (भक्तमंडळ कक्ष) मार्फत देणगी काऊंटर्स येथे देणगीदार साईभक्तांना उदी प्रसाद देणेकामी सफेद प्रिंटेड पाकिटे छपाईसह खरेदी करणेकामी खालील तपशिलाप्रमाणे व अटी शर्तीस अनुसरून सीलबंध पाकीटात दरपत्रके मागविण्यात येत आहे.

| अ.नं. | तपशिल | मागणी नग | दंर (जीएसटी सह) प्रति नग | एकुण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१. | सफेद प्रिंटेड पाकीटे<br>Size-4" x 5.5"( with Gum- tep)<br>PAPER-80 GSM MAPLITHO WHITE<br>( One Colour Printing matter- on Top of pocket)<br>SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI<br>Udi & Prasad- With Blessings of Shri Saibaba<br>(Bottom of packet)<br>CHIEF EXECUTIVE OFFICER,<br>SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI<br>Tal.Rahata, Dist. Ahmednagar, Maharashtra,India-423109 | ४,००,००० | | |

रजि.नं. : ई-६९, अहमदनगर

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

*शिर्डी : पोष्ट : शिर्डी - ४२३ १०९, ता. राहाता, जि. अहमदनगर, महाराष्ट्र (भारत).*

दुरध्वनी : +९१-२४२३-२५८ ५०० फॅक्स : +९१-२४२३-२५८ ७७०, टेलिग्राम : साईनाथ, शिर्डी.

अटी व शर्ती

१. उपरोक्त तपशिलात नमूद केलेप्रमाणे मंजूर दर सर्व करांसहित / जीएसटी इ. सह व शिर्डी पोहचचे आहे.

२. छपाई करावयाचे पाकीटाचा नमुना संस्थानचे सामान्य प्रशासन विभाग, मेंबरशिप कक्षात पाहणीसाठी उपलब्ध आहे. शक्यतो पाकीट नमुना पाहूनच दरपत्रक भरावे.

३. सदर पाकिटावर छपाई करावयाचा मसुदा आपले दरपत्रक मान्य झालेनंतर आपणास अलहिदा देण्यात येईल.

४. प्रिंटेड पाकीटे तयार करणेसाठी लागणारे साहित्य, डी.टी.पी. डिझाईन तयार करणे, सेल्फ स्टिकींग टेप लावणे तसेच सदर पाकीटे एका बॉस्कमध्ये ५००० नग याप्रामणे पॅकींग करून शिर्डी कार्यालयात कामाचा कार्यदिश मिळाल्यापासून १० दिवसांचे आत पोहोच करणे आपणावर बंधनकारक राहील.

५. प्रिंटेड पाकीटे छपाई झालेनंतर संस्थानचे भांडार विभाग कार्यालयामध्ये पोहोच करण्याची जबाबदारी स्वत: आपणावर राहील.

६. संपुर्ण प्रिंटेड पाकीटे छपाई प्राप्त झाल्यानंतर बीलाची रक्कम संस्थानचे विहीत पध्दतीने अदा करण्यात येईल.

७. प्रेसधारकाने प्रिंटेड पाकीटाचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास तसेच संस्थान प्रशासनाने नमूद केलेल्या कुठल्याही अटी शर्तींचा भंग झाल्यास याबाबत संस्थान प्रशासन जो निर्णय घेईल तो आपणावर बंधनकारक राहील. याबाबत प्रेसधारकाची काहीही तक्रार चालणार नाही.

८. सदरचे व्यवहारात काही वाद निर्माण झाल्यास तो राहाता कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

९. कोटेशन स्विकारणे किंवा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे.

१०. उपरोक्त अटी/शर्तीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार श्री साईबाबा संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. दरपत्रकधारकाची कोणतीही अट/शर्त श्री साईबाबा संस्थान प्रशासनावर बंधनकारक राहणार नाही, अशी दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

११. सदरचे दरपत्रक फॉर्म downloading साठी संस्थानचे संकेतस्थळ www.sai.org.in वर उपलब्ध असुन अंतिम दि. ०७/०९/२०२४ वेळ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत शिर्डी कार्यालयात पोहोचतील या बेताने पाठविण्याचे करावे. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी व विहीत मुदतीत संस्थानला सीलबंद पाकीटात पाठवावे तसेच पाकिटावर कामाचे नावाचा उल्लेख करणेत यावा. उशिरा प्राप्त झालेले दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी